# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्य समर्पिता

## दिनांक १९.६.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार दि.१९.६.२००४ रोजी मा. महापौर सौ.रूख्मीणीबाई शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची (कार्यक्रम पत्रिका ३९) सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ३.५० वाजता सुरू झाली सभेला मा.आयुक्त, संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
०३. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.शे.ईलियास किरमाणी शे.उमर
०६. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतु
०७. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
०८. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
०९. स.स.श्री.राजू रामराव शिंदे
१०. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
११. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१२. स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१३. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१४. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१५. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१६. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
१७. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१८. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
१९. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२०. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२१. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२२. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२३. स.स.श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
२४. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२५. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
२६. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
२७. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
२८. स.स.सौ.रशिदा बेगम गफ़्फ़ार यारखान
२९. स.स.श्री.मगरे सुनिल यादवराव
३०. स.स.शिंदे किशोर रावसाहेब

३१. स.स.श्री.अ.कादर अ.हफ़ीज
३२. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३३. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
३४. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
३५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३६. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
३७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब
३८. स.स.श्री.तायडे पांडूरंग यशवंतराव
३९. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४०. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४१. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४२. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४३. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४४. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
४५. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४६. स.स.श्री.अ.कदिर मौलाना सय्यद
४७. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
४८. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
४९. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५०. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
५१. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
५२. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
५३. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५४. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
५५. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५६. स.स.श्री.स.सलिम स.युसूफ़
५७. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
५८. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
५९. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
६०. स.स.श्री.अजिजखान गणीखान
६१. स.स.श्री.अफसरखान यासीनखान
६२. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६३. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
६४. स.स.श्री.कै सर खान बद्रोद्दीन खान
६५. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
६६. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६७. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा
६८. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
६९. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
०२. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे

०३. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर
०४. सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

मा.महापौर : विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. ३५०/१ :**

दि. १८.५.२००४ रोजीची विशेष सर्वसाधारण सभा आणि दिनांक २५.५.०४ रोजीची संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : दि.२५.०५.२००४ च्या इतिवृत्तातील पान क्र.२५ वर जो ऐनवेळी प्रस्ताव क्र.३१८/२ मंजूर केला,प्रस्ताव ऐनवेळचा असल्याने सभागृहात चर्चेसाठी वेळ मिळाला नाही. तो रद्द करून त्यावर सविस्तर चर्चा करण्यांत यावी.

सौ.चंद्रभागाबाई दाणे : नेहरू प्लेस मध्ये नाल्यावर पुल बांधण्याची परवानगी कशी दिली, बांधकाम परवानगी दिली असेल तर रद्द करण्यात यावे. एक वर्षापासून पत्र देत आहे. अधिकारी उत्तर देत नाही. तसा प्रस्ताव सभागृहात आलेला नाही मंजूरी घेतलेली नाही.

मा.महापौर : विषय पत्रिका घेण्यात येईल नंतर चर्चा घेण्यात येईल.

श्री.सुनिल मगरे : एकदा ठराव मंजूर झालेला आहे,तो रद्द करू नये.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : या ठरावास आमचा विरोध नाही,परंतू त्यावर चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा. आम्ही कोणाच्या विरोधात नाही. मला या विषयावर चर्चा करावयाची आहे.

याचवेळी मा.महापौर डायस समोर स.सभासद मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.सुनिल मगरे : प्रस्ताव मंजूर केलेला आहे. रद्द करू नये.तसेच सायली नावाच्या मुलीचा पुलावरून पडून मृत्यु झाला होता. पून्हा नाल्यावर अनधिकृत बांधकाम होत आहे. ते पाडले पाहीजे त्यावर चर्चा होवून कार्यवाही झाली पाहीजे.

मा.महापौर : स.सदस्या सौ.दाणे यांचे प्रश्नाचा खुलासा करण्यांत यावा.

सहा.संचालक (न.र.) : स.सदस्य सौ.चंद्रभागाबाई दाणे यांनी दि.०७.०५.२००४ रोजी नाल्यावर अनधिकृत बांधकाम झालेले पाडण्याबाबत तक्रार केलेली होती त्याबाबतचा खुलासा खालीलप्रमाण.

ड्रेनेज लाईन व नाल्यावर अतिक्रमण करून बांधकाम केल्याबाबत तक्रार व सविस्तर कार्यवाही करणे बाबत.

विषयांकित निवेदनात '' नेहरू पॅलेस जागा सी.टी.सर्वे नं.२०६६३ या ठिकाणी महानगरपालिकेचा १०० फुटाचा रूंदीचा नाला आहे. त्यामध्ये मुख्य ड्रेनेज लाईन आहे. मुथियान बिल्डर्स, सफर हॉटेल,शांग्रीला डिलक्स हॉटेल, लंकेश हॉटेल,मिड टाऊन हॉटेल या हॉटेल मालाकांनी त्या नाल्यावर व ड्रेनेज लाईनवर बांधकाम केले आहे.यांना कोणत्या आधारे बांधकाम परवानगी दिली आहे,हे बांधकाम एफ.एस.आय.नुसार झाले का ? हा नाला २० फुटाचा राहिला आहे. कृपया खुलासा करावा '' असे नमूद आहे. त्याबाबत खुलासा खालीलप्रमाणे सादर.

नेहरू पॅलेस जागा सी.टी.एस.क्र.२०६६३/१,२०६६३/१/१ते ४ मोहल्ला -कोतवालपूरा येथे सौ.जेहरा बेगम सलीम अहमद व ताहेर अहमद सलिम अहेमद यांना बांधकाम परवाना क्र.९४/२००१ दि.१०.०५.२००१

(संचिका क्र.३६४/१७/२०००) अन्वये जमिनीचे एकूण क्षेत्र ६३११.५० चौ.मी. वर ०.७५ चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) चे मर्यादेत ४७३३.६२५ चौ.मी.अनुज्ञेय क्षेत्रापैकीच्या जागेवर रितसर मा.आयुक्त यांची दि.१९.०४.२००१ रोजीच्या मान्यतेनुसार समुह गृह निर्माण योजनेस मान्यता देण्यांत आली असून उक्त बांधकाम परवाना मधील ''अट क्र.१८ आपण प्रस्तावित केलेले पूल व नाला ड्रेनिंगचे काम सहा महिन्याचे आत पूर्ण करावे लागेल पून्हा मुदतवाढ मिळणार नाही'' अशी आहे. तसेच अट क्र.२१ ही सदर भुखंडालगत असलेल्या नाल्याच्या रिटेनिंग वॉलचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी जागेच्या सीमा व हद्दी नगर भूमापन अधिकारी व कार्यकारी अभियंता, मनपा यांचेकडून निश्चित करून कार्यकारी अभियंता,मनपा यांची मान्यता व निगराणीखाली करणेबाबत आहे.

उपरोक्त सी.टी.एक्र.२०६६३ च्या जमिनीचे विकासक श्री.मुथियान असल्याचे दिसते. त्यांनी भोगवटा प्रमाणपत्रासाठी प्रकरण अद्याप सादर केलेले दिसून येत नाही.

विकास योजना नकाशाचे अवलोकन केले असता सदरील नाल्याची रूंदी ही १६.० मी आणि १२.० मी.चे दरम्यान दिसून येते. उपरोक्त पुलाचे ठिकाणी सदरील नाल्याची रूंदी ही १२.० मी अस्तित्वात आहे.

उपरोक्त पुल व रिटेनिंग वॉल यांचे बांधकामाची दि.१७.०६.२००४ रोजी स्थळ पाहणी केली असता नाल्याचे जागेवर ७.५० मी.रूंद आणि १२.२० मी.लांबीच्या पुलाचे आणि रिटेनिंग वॉलचे बांधकाम पूर्वीच पूर्ण झालेले दिसून आले,तसेच त्याचा जागेवर वापर सुरू आहे. वरील बांधकामाची गुणवत्ता सकृत दर्शनी उत्तम असल्याची दिसून आले. तसेच इमारतींचे बांधकाम प्रगतिपथावर दिसून आले. रितसर परवानगी देण्यात आलेली आहे.

सौ.चंद्रभागाबाई दाणे : नाला १०० फुट रूंदीचा होता नाला राहीलेला नाही नाली झालेली असून मा.आयुक्त यांनी सुध्दा पाहणी केलेली आहे. पत्र दिलेले आहे. कार्यवाही करावी.

मा.आयुक्त : बांधकाम परवानगी दिली ही वस्तुस्थिती आहे. बांधकाम परवानगी देतांना २१ ते २२ अटी शर्ती आहेत. त्यातील काही अटी शर्तींचा भंग संबंधीताने केलेला असेल तर त्या संबंधीचे कार्यवाही करण्याचे आदेशीत केलेले आहेत. काळजीपुर्वक बांधकाम केले असेल तर ठीक आहे. परंतू अटी शर्तीचा भंग झाला असेल तर कार्यवाही होईल.

श्री.नासिरखॉन : दोन महिन्यापूर्वी या सभागृहात सिल्लेखाना येथील एका प्रकरणाच्या बाबत चर्चा झालेली होती. आठ दिवसात कार्यवाही होईल असे म्हटले होते. २ महिने झाले अद्याप कार्यवाही झालेली नाही.

श्री.मो.जावेद मो.इसाक : एस.टी. कॉलनी भागात नाल्याच्या बाजूला, संरक्षित भिंत बांधण्यात आलेली होती. ती पाडण्यात का आलेली आहे. तीन महिन्यापूर्वी मी पत्र दिले. उत्तर मिळाले नाही. महत्वाचा विषय आहे. त्या प्रकरणांत नगर सेवकांना मारहाण झालेली आहे. १९९६ साली संरक्षित भिंतीचे बांधकाम केलेले होते. परवाच्या पावसामुळे लोकांच्या घरामध्ये पाणी गेले यास जबाबदार कोण? प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. खुलासा घेण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : विषय क्र.५ व ऐनवेळचे विषय क्र. ३-४ विषय समिती मार्फ़त घ्यावे. तसेच विषय क्र.६ मध्ये ५ अर्ज हे संपूर्ण वाक्य कमी करून मंजूर करावे.

श्री.हिदायत अली : दुरूस्त्या करून मंजूर करावे.

श्री.मो.जावेद मो.इसाक : त्याचा खुलासा मागविला कागद पत्राची मागणी केली होती देण्यात आले नाही.

श्री.भगवान रगडे : विषय पत्रिका घेण्या अगोदर चर्चा घेण्यात यावी. पावसाळ्याचे दिवस आहेत. नाल्याच्या बाजूला राहणाऱ्या काही नागरीकांच्या घरात नाल्याचे पाणी गेले. वित्त हाणी झालेली आहे. संसार उध्वस्त झालेले आहे. त्यावर चर्चा करून निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

मा.मुख्यलेखाधिकारी : इतिवृत्त पान १६ वर ठरावात जमा १८५.कोटी ११ लाख ३५ हजार खर्च रू.१७५ कोटी २० हजार प्रमाणे रू.११.१५ लाख शिल्लकी अंदाजपत्रक अशी दुरूस्ती करावी.

(याच वेळी बरेच स.सदस्य मा.महापौर डायस समोर जाऊन मोठ मोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

मा.महापौर : सर्व स.सभासदांनी आपआपल्यावर जागेवर बसावे.

श्री.मोहम्मद जावेद : १९९६ साली एस.टी.कॉलनी भागात संरक्षित भिंत बांधण्यात आलेली होती. तीन महिन्यापूर्वी मी पत्र देऊन कागदपत्राची मागणी केली व अद्याप मला कागदपत्र मिळालेली नाही. सदर संरक्षित भिंत का पाडण्यात आली खुलासा करावा.

श्री.प्रशांत देसरडा : विषय पत्रिका झाल्यानंतर चर्चा करावी.

श्री.नासिरखॉन : शहराचा विकास करण्यासाठी सभा आयोजित करतो. डायस समोर स.सभासद येतात त्यांना सुचना करूनही जागेवर बसत नसतील तर सभागृहा बाहेर जाण्याचे सुचना कराव्यात.

श्री.अजिजखॉन गणीखॉन: स.सदस्य श्री.जावेद मोहम्मद यांनी जी सुचना केली त्याचा खुलासा करावा.

सौ.लिलावती घायतिलक: या सभागृहात काय कामकाज चालू आहे. स.सदस्याकडे लक्ष द्यावे त्यांचे प्रश्न नोंद करावे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : विषय क्र.१ वर चर्चा व्हावी. ठराव क्र. ३१८/२ वर चर्चा करावी. हा प्रस्ताव कायम न करता सर्व इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर करावे.

मा.महापौर : विषय क्र.३१८/२ वगळता उर्वरीत इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर व स.सदस्यांनी दुरूस्त्या सूचविल्याप्रमाणे सर्व विषय व सदस्यांचा ऐनवेळचा एक विषय मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

दि. १८.५.२००४ रोजीची विशेष सर्वसाधारण सभा आणि दिनांक २५.५.०४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.३१८/२ वगळून उर्वरीत इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र. ३५१/२ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दिनांक १८.४.२००४ ते २०.४.२००४ या तीन दिवसापर्यंत जागतिक वारसा दिन पाळण्यात आला आहे. जागतिक वारसा दिन समितीने घेतलेल्या निर्णयानुसार महापालिकेचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय विनामूल्य खुले ठेवण्यात आले आहे.तसेच दिनांक ०१.५.२००४ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त संग्रहालय विनामूल्य खुले ठेवण्यात आले आहे तरी दिनांक १८.४.२००४ ते दिनांक २०.४.२००४ व दिनांक ०१.५.२००४ रोजी संग्रहालय विनामूल्य ठेवण्यात आलेल्या कृतीस कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

तसेच असाही प्रस्ताव सादर करण्यात येतो की, या पुढील प्रत्येक वर्षाच्या १८ ते २० एप्रिल पर्यंत, जागतिक वारसादिना निमित्त तसेच १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय अभ्यंगतांकरीता विनामूल्य खुले ठेवण्यांत येईल.

करिता वरील कार्योत्तर व कार्यपुर्वोक्त प्रस्ताव मान्यतेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १८.४.२००४ ते दिनांक २०.४.२००४ व दिनांक ०१.५.२००४ रोजी संग्रहालय विनामूल्य खूले ठेवण्यात आले होते त्यास कार्योत्तर मान्यता देण्यांत येते. तसेच या पुढील प्रत्येक वर्षाच्या १८ ते २० एप्रिल पर्यंत, जागतिक वारसादिना निमित्त तसेच १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय अभ्यंगतांकरीता विनामूल्य खुले ठेवण्यांसही सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५२/३ :**

सर्व साधारण सभे मध्ये मालमत्ता कर व पाणी पट्टी वसूली संदर्भात दिनांक ०६.०१.२००४ रोजी चर्चा झाली. चर्चे मध्ये अनधिकृत नळ अधिकृत करणे करीता पुन्हा अभय योजना सुरू करावी अशा प्रकारे सुचना प्राप्त झाली आहे.

या पूर्वी सर्व साधारण सभे मध्ये ठराव क्रमांक ५६३/२ दिनांक १८.०२.२००४ अन्वये मान्यता मिळाल्या प्रमाणे दिनांक १५.०४.२००२ ते ३०.११.२००२ पर्यंत नागरिकांनी स्वत:हून नळ जोडणी अधिकृत करून घ्यावी असे आवाहन करून अभय योजना राबविण्यात आली. त्यांत नळाचा वापर व आकार यावर आधारीत आगाऊ पाणी पट्टी व दंड तसेच नियमानुसार बोअरींग चार्जेस,रस्ता दुरूस्ती पोटीची रक्कम याचा भरणा करून घेऊन नळ जोडणी अधिकृत करण्यात आली. या योजनेत एकूण २१४६ अनधिकृत नळ अधिकृत करण्यात आले व त्यासाठी रूपये ४९,५४,०२४/- दंड व नळपट्टी पोटी वसूल करण्यांत आले.

ही योजना नागरिकांचा अल्प प्रतिसाद पाहून बंद करून नळांचे प्रत्यक्ष जागेवर जाऊन सर्वेक्षण करणेसाठी अनधिकृत नळ शोधन व धडक कृती मोहीम सुरू केली. त्यांत नागरिकांना त्यांचे नळाचा आकार व वापर यावर दंडाची रक्कम मंजुरी नुसार आकारणी करून नळ जोडणी अधिकृत करणेची तरतुद होती. या योजने अंतर्गत एकूण १७९५९ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले व त्यात २१२० अनधिकृत नळ सापडले, त्यापैकी १३३ नळ अधिकृत करण्यात आले व दंड व नळ पट्टी पोटी रूपये ५,६१,४०९/- वसूल करण्यात आले. या योजने साठी आठ धडक कृती पथके स्थापन करण्यात आली होती, प्रत्येक पथक उप अभियंता यांचे नियंत्रीखाली काम करीत होते. व त्यांना साह्य करण्यासाठी तीन कनिष्ठ अभियंता व दोन दुय्यम आवेक्षक देण्यात आले होते. तथापि पथकातील बहुतांश कर्मचाऱ्यांना गुंठेवारी विकास, मालमत्ता कर वसूली, जकात कर वसूली व निवडणूकांच्या संदर्भातील कामे देण्यात आली. त्यामुळे ही अनधिकृत नळ शोधन व धडक कृती मोहिम बंद पडली.

आता नव्याने सुचना प्राप्त झाल्या प्रमाणे पुन्हा अभय योजना राबवावी असे ठरले आहे. आता जर अभय योजना राबवायची असेल तर त्यांत विभागीय अधिकारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. या नव्याने राबवायच्या अभय योजनेत नळांचे सर्वेक्षण करून प्रत्यक्ष नळाचे जागेवर जाऊन नागरिकांचे नळ अधिकृत करावेत व त्यांचे कडून जागेवर नळ अधिकृत करणे साठीची कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. दोन्ही योजनांचे अनुभवा नुसार नागरिक हे स्वत:हून नळ जोडणी अधिकृत करून घेण्यास पुढे येत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तीचा विचार करता प्रत्यक्ष जागेवर जाऊन अनधिकृत नळ धारकांचे नाव व पत्ता तसेच मालमत्ता कराची पावती,मालकी हक्काची कागदपत्रे घेऊन नळ जोडणी अर्जावर घर मालकाची/ भाडेकरूची जागेवरच स्वाक्षरी घेणे व नळ जोडणी अधिकृत करणे अशा प्रकारे कार्यवाही केल्यास ही योजना यशस्वीपणे राबविता येवू शकते. यासाठी त्या भागाचा कर निरिक्षक, पाणी पुरवठा दुय्यम आवेक्षक व पाणी पुरवठा विभागाचे मजुर यांचे सह संबंधीत शाखा/कनिष्ठ अभियंता असे

पथक राहील. या पथकावर संबंधीत विभागीय अधिकारी यांचे नियंत्रण राहील. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दर आठवड्यास कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा) यांना सादर करणे बंधनकारक राहील. सर्व विभागीय अधिकाऱ्यांकडून आलेले अहवाल एकत्रित करून त्यांचा अहवाल कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) हे मा.आयुक्त यांना दर आठवड्यास सादर करतील. तसेच आलेल्या नळ जोडणी अर्जांना खाते क्रमांक देण्याचे काम करतील. या योजने तहत खालील प्रमाणे दंडाची आकारणी व पाणी पट्टी आकारल्या जाईल.

| अ.क्र. | नळाचा वापर | व्यास | दंडाची रक्कम | रस्ता दुरूस्ती व बोअरींग फ़ीस | चालु वर्षाची पाणी पट्टी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | घरगुती | १५ मी.मी. १/२ इंच | १०००/- | २६०/- | १८००/- | ३०६०/- |
| | | २० मी.मी. ३/४ इंच | २०००/- | २००/- | २९२५/- | ५१२५/- |
| | | २५ मी.मी. १ इंच | ३०००/- | २००/- | ६८२५/- | १०,०२५/- |
| २. | व्यावसायीक | १५ मी.मी. १/२ इंच | ४०००/- | २००/- | ६५००/- | १०,७००/- |
| | | २० मी.मी.३/४ इंच | ५०००/- | २००/- | १२,०००/- | १७,२००/- |
| | | २५ मी.मी.१ इंच | ६०००/- | २००/- | २५,०००/- | ३१,२००/- |

३. घोषित (अधिकृत) झोपडपट्टया :- घरगुती पाणी वापरासाठी अनधिकृत नळ अधिकृत करण्यासाठी दोन समान हप्त्यात वरील प्रमाणे दंड व पाणी पट्टी वसूल करण्यात येईल मात्र व्यावसायिक वापरासाठी वरील प्रमाणे एकदाच (एक हप्त्यात) वसूली करण्यात येईल.

४. अनधिकृत वसाहती:- अनधिकृत वसाहती मध्ये ज्या ठिकाणी या अगोदरच जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत व त्यातून नळ जोडण्या मंजुर केलेल्या आहेत अशा वसाहतींनाही ही योजना लागू राहील. मात्र या योजने अंतर्गत नळ जोडणी अधिकृत केली म्हणजे संबंधीतांचे घर/वसाहत अधिकृत केली असे होणार नाही. ही परवानगी म्हणजे फ़क्त पाणी वापराची परवानगी असेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,शहरातील अनधिकृत नळ जोडणी अधिकृत करण्यासाठी राबविण्यात आलेल्या अभय योजनेप्रमाणे पुन्हा अनधिकृत नळ अधिकृत करण्यासाठी संबंधित विभागाचे विभागीय अधिकारी यांचे नियंत्रणाखाली त्या भागाचे कर निरिक्षक,पाणी पुरवठा विभागाचे कनिष्ट/शाखाअभियंता,दुय्यम आवेक्षक,पाणी पुरवठा विभागाचे मजुर इ.यांचे एक पथक तयार करून प्रत्यक्ष नळाचे जागेवर जावून अनधिकृत नळ धारकाचे नांव/पत्ता, मालमत्ता कराची पावती,मालकी हक्का बाबतचे कागदपत्र घेवून,नळ जोडणी अर्जावर घर मालक /भाडेकरू यांची जागेवरच स्वाक्षरी घेणे व अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करून देण्यासाठी अभय योजना राबविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

या अभय योजनेनुसार अधिकृत करण्यात येणाऱ्या नळ जोडणीसाठी खालीलप्रमाणे दंड व पाणीपट्टी आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | नळाचा वापर | व्यास | दंडाची रक्कम | रस्ता दुरूस्ती व बोअरींग फ़ीस | चालु वर्षाची पाणी पट्टी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | घरगुती | १५ मी.मी. १/२ इंच | १०००/- | २६०/- | १८००/- | ३०६०/- |
| | | २० मी.मी. ३/४ इंच | २०००/- | २००/- | २९२५/- | ५१२५/- |
| | | २५ मी.मी. १ इंच | ३०००/- | २००/- | ६८२५/- | १०,०२५/- |
| २. | व्यावसायीक | १५ मी.मी. १/२ इंच | ४०००/- | २००/- | ६५००/- | १०,७००/- |
| | | २० मी.मी.३/४ इंच | ५०००/- | २००/- | १२,०००/- | १७,२००/- |
| | | २५ मी.मी.१ इंच | ६०००/- | २००/- | २५,०००/- | ३१,२००/- |

वरील अभय योजनेनुसार घोषित झोपडपट्टी भागातील घरगुती वापरातील अनधिकृत नळ जोडणी अधिकृत करतांना दंड व पाणीपट्टीची वसुली दोन समान हप्त्यात वसुल करण्यात यावी. मात्र व्यावसायिक वापरातील अनधिकृत नळ जोडणी अधिकृत करतांना वरीलप्रमाणे एकदाच रक्कम वसुल करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

अनधिकृत वसाहतीत या योजनेनुसार अधिकृत करण्यात आलेली नळ जोडणी म्हणजे संबंधीताचे घर / वसाहत अधिकृत केली असे होणार नाही. फक्त पाणी वापराची परवानगी असेल. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५३/४ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार मौजे ईटखेडा येथील गट नं.६२/१ व ६२/२ मधील आरक्षण क्र. D/N '' अग्निशमन दल '' या प्रस्तावाने बाधित क्षेत्रासाठी मिळकतधारकाने (श्री.मुजताना महमदखान व इतर) यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सुचना शासनास दिनांक ०६.०८.१९९७ रोजी बजावलेली आहे.

उक्त खरेदीसूचनेनूसार भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे दि.०१.०६.९८ रोजी पाठविण्यात आले असून प्रकरणांत विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद यांनी भूसंपादनाची पूढील कार्यवाही प्रस्तावित केली असून एकूण मोबदल्याच्या २/३ रक्कम रूपये १.२० कोटी दि.१२.०४.२००२ च्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.

उपरोक्त २/३ मोबदला उक्त कार्यालयाकडे पाठविणेसाठी मिळकत धारकाने Notice v/s.487 of The B.P.M.C. Act 1949 U/s 80 नुसार महानगरपालिकेला नोटीस दि.२०.०२.२००४ ला दिलेली आहे.

उपरोक्त जमिन ''अग्निशमन दलासाठी '' आवश्यक असल्याचे मुख्य अग्निशमन अधिकारी महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अभिप्राय नोंदविलेला आहे.

सबब वरील सर्व बाबीचा विचार करता २/३ मोबदला रक्कम रू.१.२० कोटी विशेष भूसंपादन अधिकारी, औरंगाबाद यांचेकडे जमा करणे बाबत प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजने (वाढीव हद्द) नुसार मौजे ईटखेडा येथील गट नंबर ६२/१ व ६२/२ मधील आरक्षण क्र.D/N '' अग्निशमन दल '' या प्रस्तावाने बाधीत होणारी जमिन संपादित करण्यासाठी एकुण मोबदल्याच्या २/३ रू.१.२० कोटी विशेष भू संपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचेकडे भरणा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५४/५:**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, महानगरपालिका शिक्षण विभागात पर्यवेक्षकाची पदे भरतांना महानगरपालिकेच्या कर्मचारी भरती नियम (आर.आर.) मध्ये व शासन नियमात तफ़ावत दिसून येते. शासनाच्या नियमाप्रमाणे पदोन्नती देणे योग्य असल्याने आर.आर.मध्ये योग्य दुरूस्ती करून पदे भरणे इष्ट वाटते.

खालील प्रमाणे महानगरपालिका सेवा भरती नियम व शासन नियमाचा उल्लेख दर्शविण्यात येत आहे.

| पद | महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एएमसी-१६९३/१२१९/प्र.क्र.९७/नवि-२४, मंत्रालय,मुंबई-३२ दि.१६ मे ९४ नुसार मान्य असलेले पूर्वीचे नियम- नियुक्तीची पध्दत अस्तित्वात असलेली तरतूद- | आता मान्य करावयाचे नविन नियम महाराष्ट्र शासन शिक्षण व सेवा योजन विभाग शासन निर्णय क्र.एमएससी/१०८३/६२२५९८/६२१/ प्रा.शि.-३मंत्रालय,मुंबई-३२दि.१४.९.८४- नविन प्रस्तावित दुरूस्ती. |
|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| शिक्षण पर्यवेक्षक वेतन श्रेणी रू.५५००-८०००/- | १)कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक<br>२) डी.एड.<br>३)औरंगाबाद महानगरपालिकेत आधिपासून सेवेत असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे. | मुख्याध्यापकाचा पाच वर्षाच्या अनुभवासह स्तंभ क्र.३ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे अर्हता असलेल्या मुख्याध्यापकाचा संवर्गातून पदोन्नती द्वारे नियुक्ती. | १) संबंधित पर्यवेक्षक पदे शिक्षण मंडळाच्या सेवेत असलेल्या प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षकामधून सेवा ज्येष्ठता एव गुणवत्ता (Seniority -Cum-Merit) या आधारे भरण्यात यावीत.<br>२) सेवेतील अपदवीधर प्राथमिक शिक्षक व शिक्षण मंडळा बाहेरील उमेदवारांचा या पदासाठी विचार करण्यात येऊ नये.<br>३) या उमेदवारांची निवड प्रचलित नियमानुसार शिक्षण मंडळाच्या कर्मचारी निवड समिती मार्फ़तच करण्यात यावी.<br>४) संबंधीत प्रशासन अधिकाऱ्यांनी प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षकांची सेवा ज्येष्ठता यादी वेळोवेळी तयार करून ती प्रसिध्द करावी. |

महाराष्ट्र शासन शिक्षण व सेवा योजन विभाग शासन निर्णय क्र.एसएएससी/१०८३/६२२५९८/ (६२१ प्रा.शि.३,मंत्रालय,विस्तार भवन मुंबई दि.१४.९.८४ या शासन निर्णयाप्रमाणे आर.आर.मध्ये बदल करून पर्यवेक्षकांची पदे भरण्यास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर.)

**<u>ठराव :</u>**

सदर प्रस्ताव माध्यमिक,पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती मार्फत ठेवण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**<u>विषय क्र. ३५५/६ :</u>**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका आस्थपनेवरील जनसंपर्क अधिकारी या पदासाठी सेवा भरती नियमामध्ये असलेली तरतूद परिपूर्ण नसल्याने त्यामध्ये अंशत: बदल करणे आवश्यक वाटते.

औरंगाबाद महानगरपालिका सेवा भरती नियमातील जनसंपर्क अधिकारी या पदासाठी,

| सेवा भरती नियमातील मूळ तरतूद | सेवा भरती नियमामध्ये करावयाची दुरूस्ती |
|---|---|
| १) कोणत्याही शाखेचा पदवीधर | १) कोणत्याही शाखेचा पदवीधर |
| २) वृत्त विद्या पदवीधर | २) वृत्त विद्या पदवीधर |
| ३) औरंगाबाद महानगरपालिकेत आधीपासून असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे. | ३) औरंगाबाद महानगरपालिकेत आधीपासून असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे. |
| ४) उक्त प्रमाणे उपबंधीत केल्यानुसार अर्हता असलेल्या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांमधून नियुक्ती | ४) उक्त उपबंधीत केल्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महानगरपालिकेतील कोणत्याही संवर्गातील पात्र कर्मचाऱ्यांमधून गुणवत्तेनुसार नामनिर्देशनाने नियुक्ती किंवा |

| | |
|---|---|
| | अशा कर्मचाऱ्यांमधून किमान पाच अर्जापेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास सेवा योजन कार्यालयाकडून पात्र अर्हताधारकांची यादी मागवून सरळ सेवेने नियुक्ती. |
| ५) अनुभव | जनसंपर्क अधिकारी या पदाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. |

उक्त प्रमाणे सेवा भरती नियमातील अ.क्र.४ वर दर्शविलेली तरतूदीमध्ये सेवा भरती नियमामध्ये दुरूस्ती करणे आवश्यक वाटते कारण पदोन्नती देतांना कोणत्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती द्यावयाची याचा उल्लेख त्यामध्ये करण्यात आलेला नाही.

करिता उक्त दर्शविल्याप्रमाणे सेवा भरती नियमामध्ये दुरूस्ती करण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, महानगरपालिका आस्थापनेवरील जनसंपर्क अधिकारी या पदासाठी सेवा भरती नियमातील तरतुद परिपूर्ण नसल्याने या तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| **सेवा भरती नियमातील मूळ तरतूद** | **सेवा भरती नियमामध्ये करावयाची दुरूस्ती** |
|---|---|
| १) कोणत्याही शाखेचा पदवीधर | १) कोणत्याही शाखेचा पदवीधर |
| २) वृत्त विद्या पदवीधर | २) वृत्त विद्या पदवीधर |
| ३) औरंगाबाद महानगरपालिकेत आधीपासून असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे. | ३) औरंगाबाद महानगरपालिकेत आधीपासून असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे. |
| ४) उक्त प्रमाणे उपबंधीत केल्यानुसार अर्हता असलेल्या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांमधून नियुक्ती | ४) उक्त उपबंधीत केल्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महानगरपालिकेतील कोणत्याही संवर्गातील पात्र कर्मचाऱ्यांमधून गुणवत्तेनुसार नामनिर्देशनाने नियुक्ती. |
| ५) अनुभव | जनसंपर्क अधिकारी या पदाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५६/७ :**

नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था,मुंबई यांनी दिनांक २ जून २००४ चे पत्रकान्वये प्रभाग समितीच्या सक्षम कार्यपध्दती या विषयावर संस्थेच्या अंधेरी येथील संकुलात दिनांक ७ जुलै २००४ रोजी आयोजित एक दिवसीय कार्यशाळेसाठी प्रभाग समित्यामधील तीन (३) सदस्यांना प्रशिक्षणास पाठविण्यास कळविले आहे. यासाठी शुल्क आकारणी नाही. परंतू येण्याजाण्याचा खर्च महानगरपालिकेस करावा लागेल. तसेच संख्येत वाढ झाल्यास त्याचा सर्व खर्च महानगरपालिकेस करावा लागेल.

औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये चार प्रभाग समित्या कार्यरत आहेत. या प्रभाग समितीचे सर्व सभापती यांना प्रशिक्षणास सहभागी होण्यास आणि मुंबई येथे जाणे/येणे व मुंबई येथील प्रवास काळातील निर्वाह भत्ता यासाठीच्या संभाव्य खर्चास मान्यता होणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था,मुंबई यांनी आयोजीत केलेल्या प्रभाग समितीच्या सक्षम कार्यपध्दती या विषयावर संस्थेच्या अंधेरी येथील संकुलात दिनांक ७

जुलै २००४ रोजी आयोजित एक दिवसीय कार्यशाळेसाठी प्रभाग समित्याचे चार (४) सभापतींना प्रशिक्षणास पाठविण्यास तसेच सदरील दौऱ्यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५७/८:**

नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था,मुंबई यांनी दिनांक २१.४.२००४ च्या पत्रकान्वये '' लोकप्रतिनिधी च्या अधिकाराचे गुणसंवर्धन करणे या विषयावर दिनांक २३ जून २००४ ते २५ जून २००४ या कालावधीत जयपूर (राजस्थान) येथील हॉटेल मौर्य येथे आयोजित प्रशिक्षण सत्रात महापौर, विविध समित्यांचे सभापती आणि निर्वाचित पालिका सदस्य सहभागी होऊ शकतील. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था,मुंबई तर्फ़े निवास व्यवस्था केली जाणार नाही. या प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या प्रशिक्षणार्थींना निवास व्यवस्था स्वत: करावी लागेल. प्रशिक्षण काळात प्रमाणपत्र हस्तगत करणेसाठी तीन दिवस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

औरंगाबाद महानगरपालिके तर्फ़े दोन पदाधिकारी/ सदस्य यांना या प्रशिक्षण सत्रात सहभागी होण्यास आणि जयपुर येथे जाणे/येणे, जयपुर येथील प्रवास काळातील निर्वाह भत्ता, जयपुर येथील निवास व्यवस्था व प्रशिक्षण नोंदणी फ़ीस व इतर खर्चासाठी सुमारे प्रत्येकी रू.६,०००/- संभाव्य खर्चास मान्यता होणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.माणिक साळवे : सहा-सात सदस्य व एक कर्मचारी यांना पाठवावे.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था,मुंबई यांनी दिनांक २१.४.२००४ च्या पत्रकान्वये ''लोकप्रतिनिधी च्या अधिकाराचे गुणसंवर्धन करणे या विषयावर दिनांक २३ जून २००४ ते २५ जून २००४ या कालावधीत जयपूर (राजस्थान) येथे आयोजित प्रशिक्षण सत्रात सहभागी होण्यासाठी सात सन्माननीय सदस्य आणि एक कार्यालयीन कर्मचारी यांना जयपुर येथे जाण्यास तसेच जयपुर येथील प्रवास काळातील निर्वाह भत्ता, जयपुर येथील निवास व्यवस्था व प्रशिक्षण नोंदणी फ़ीस व इतर खर्चासाठी सुमारे प्रत्येकी रू.६,०००/- संभाव्य खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ३५८/१ :**

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध खाजगी एजन्सीधारकाने महानगरपालिकेनेच पुरवठा केलेल्या पिण्याच्या पाणी लाल शुध्द करून '' मिनरल वॉटर '' सारखेच प्रकल्प करून व्यवसाय करीत आहेत.

तथापी महानगरपालिकेने असाच ''मिनरल वॉटर'' चा प्रकल्प बी.ओ.टी.पध्दतीने राबविल्यास महानगरपालिकेचे महसुली उत्पन्नात भर पडू शकते. करीता महानगरपालिकेच्या फारोळा जलशुध्दीकरण केंद्रात हा प्रकल्प उभारण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.राधाकृष्ण गायकवाड अनुमोदक : श्री.रणधिरसिंह होलीये

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या फारोळा जलशुध्दीकरण केंद्रात ''मिनरल वॉटर'' चा प्रकल्प बी.ओ.टी.पध्दतीने राबविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५९/२ :**

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद येथील हातगाडी व फेरीवाले यांना परवाना देवून त्यांच्या कडून शुल्क आकारून वसुली करण्याचे मंजूर झाले आहे त्याबाबत टेंडर द्वारे जाहीरात देवून ठेकेदार नियुक्त करण्यांत आलेले होते व त्यांच्याकडून वसुली होत आहे. परंतु ठेकेदाराचे नियुक्त कर्मचारी हे हातगाडीवाले यांना अपमानाची वागणूक व शिवीगाळ करून वसुली करीत असल्याचे अनेक हातगाडीवाले यांनी सांगितले आहे.

तरी सध्या नविन देण्यात येणारा टेंडर रद्द करण्यांत यावा व आपल्या मनपाच्या आठ झोन मधुन कर्मचारी नियुक्त करून वसुली करण्यांत यावे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.सलमा बानो अनुमोदक : श्री.गाजी सादोद्दीन, श्री.अजीजखान गणीखान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद येथील हातगाडी व फेरीवाले यांना परवाना देवून त्यांच्या कडून शुल्क वसूली ठेकेदारा मार्फत करण्यांत येते.याबाबतीत नविन देण्यांत येणारे टेंडर रद्द करून ठेकेदारा मार्फत वसूली न करता महानगरपालिकेच्या आठ झोन मधुन कर्मचारी नियुक्त करून वसुली करण्यांत यावे,यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६०/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक २० जानेवारी २००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.२४५/९ अन्वये महिला व बाल कल्याण समितीचे स.सदस्यांना राज्या बाहेरील विविध महानगरपालिकेतर्फे महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना संदर्भात माहिती घेणेसाठी महिला व बाल कल्याण समितीचे सदस्यांना केरळ राज्यातील मनपास भेट देणे करीताचे अभ्यास दौऱ्यास व येणाऱ्या संभाव्य खर्चास स्विकृतीसह मंजुरी देण्यात आलेली आहे.

तथापि सदरील अभ्यास दौरा हा महिलांसाठी / विधवा महिला व आर्थिकदृष्ट्या गरीब व अनाथ महिलांसाठी राबविण्यांत येणाऱ्या योजना बाबत असल्याने सदरील अभ्यास दौऱ्यासाठी सर्व महिला सदस्यांना दौऱ्याकरीता परवानगी देण्यांत यावी व यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरी देण्यात यावी करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.साधना सुरडकर, सौ.निखत परविन एजाज जैदी, डॉ.आशा बिनवडे

अनुमोदक : सौ.मंदाबाई पवार, सौ.लिलावती घायतिलक

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केरळ राज्यातील महानगरपालिकांना महिला व बाल कल्याण समितीच्या सर्व सदस्यासह सर्व महिला पालिका सदस्यांना सदर दौरा करण्यासाठी परवानगी देण्यास व या दौऱ्यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६१/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,दिनांक १२.०६.२००४ रोजी औरंगाबाद शहरात मुसळधार पाऊस झाला. या पावसात पदमपुरा भागातील श्री.किशोर कांबळे यांच्या घराची भिंत कोसळून त्यांची नऊ वर्षाची मुलगी कै.कोमल किशोर कांबळे ही मृत्युमुखी पावली आहे. त्यांच्या कुटूंबाची जिवीत व वित्त हानी पाहाता त्यांना महानगरपालिकेतर्फे सहानुभूतीपुर्वक र.रू.२०,०००/- आर्थिक मदत देण्यांत यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संजय शिरसाट अनुमोदक : श्री.नंदकुमार घोडेले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १२.०६.२००४ रोजी औरंगाबाद शहरात मुसळधार पाऊस झाला. या पावसात पदमपुरा भागातील श्री.किशोर कांबळे यांच्या घराची भिंत कोसळून त्यांची नऊ वर्षाची मुलगी कै.कोमल किशोर कांबळे ही मृत्युमुखी पावली आहे. त्यांच्या कुटूंबाची जिवीत व वित्त हानी

पाहाता त्यांना महानगरपालिकेतर्फे र.रू.२०,०००/- आर्थिक मदत देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे प्रस्ताव**

**विषय क्र. ३६२/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग आदेश क्र.डी.टी.पी./११/२००३/प्र.क्र.-१७३/ई -१, दिनांक १२.६.२००३ अन्वये श्री.अण्णासाहेब शिंदे,स्वागत अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय यांची उप आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. सर्वसाधारण सभा ठराव क्र.१११/२, दिनांक २०.८.२००३ अन्वये श्री.अण्णासाहेब शिंदे यांच्या उप आयुक्त पदावरील एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीस प्रतिनियुक्तीच्या विहित अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात आली होती. श्री.शिंदे यांच्या सेवेची मनपास ह्यापुढेही आवश्यकता असल्याने त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाने म्हणजे १७ जून २००४ पासून १७ जून २००५ पावेतो वाढवून देण्याचा प्रस्ताव विचारार्थ व निर्णयार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग आदेश क्र.डी.टी.पी./११/२००३/प्र.क्र.-१७३/ई-१, दिनांक १२.६.२००३ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा, ठराव क्र.१११/२,दिनांक २०.८.२००३ अन्वये श्री.अण्णासाहेब शिंदे यांच्या उप आयुक्त पदावरील एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीस प्रतिनियुक्तीच्या विहित अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात आली होती. श्री.शिंदे यांच्या सेवेची मनपास ह्यापुढेही आवश्यकता असल्याने त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाने म्हणजे १७ जून २००४ पासून १७ जून २००५ पर्यंत वाढवून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६३/२ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या प्रकरण ६ मधील कलम ६३,(२) (३), प्रकरणा मधील तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्यीतील घनकचरा व्यवस्थापनाची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेची आहे. तसेच उपरोक्त अधिनियमाच्या मधील कलम १(ब) नूसार पर्यावरणाच्या संरक्षणाची जबाबदारी ही औरंगाबाद महानगरपालिकेची आहे. तसेच नागरी घनकचरा व्यवस्थापन नियम, २००० यांच्या अंमलबजावणीची जबाबदारी महानगरपालिकेकडे आल्यामुळे या सर्व तरतुदीचे अधिक स्पष्टीकरण देणारे नियम तयार होणे हे महानगरपालिकेच्या अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीने व नागरीकांच्या दृष्टीने आवश्यक होते. जेणे करून संबंधित अधिकाऱ्यांना व नागरीकांनाही आपल्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत हे स्पष्ट होईल तसेच या जबाबदाऱ्यांचे उल्लंघन केल्यास काय शास्ती होईल,हे ही समजेल. तसेच जबाबदाऱ्यांचे विकेंद्रीकरण करून नागरीकांचा सहभाग ही वाढावा या सर्व हेतूने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५८ च्या तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन व साफ़सफ़ाई नियोजन यासाठी हे उपविधी तयार केले आहेत.

**१ नामाभिधान, व्याप्ती व प्रारंभ :**

अ ) हे उपविधी औरंगाबाद महानगरपालिका (घनकचरा व्यवस्थापन व साफ़सफ़ाई नियोजन) उपविधी , २००४ या नावाने संबोधिण्यात येतील.

ब) औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व क्षेत्रासाठी व औरंगाबाद शहराबाहेरील परंतू महानगरपालिकेच्या ताब्यातील सर्व क्षेत्रासाठी ते लागू असतील.

क) हे उपविधी राज्य शासनाच्या मान्यतेनंतर अंतिमरित्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून अंमलात येतील.

**२) व्याख्या :-**

१) संदर्भात अथवा अर्थात काही प्रतिकूल नसल्यास या उपविधीत,

अ) ''अधिनियम ''म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ,१९४९

आ) ''महापौर''म्हणजे अधिनियमाच्या कलम १९ अन्वये निवड करण्यात आलेले महानगरपालिकेचे महापौर

इ) ''उप महापौर'' म्हणजे अधिनियमाच्या कलम १९ अन्वये निवड करण्यात आलेले महानगरपालिकेचे उप महापौर.

ई) ''सार्वजनिक उपद्रव''म्हणजे या उपविधीच्या तरतुदीनुसार विहित केलेल्या पध्दतीने जाणूनबुजून व अजाणता पालन न करण्याचे झालेले कोणतेही कृत्य.

उ ''प्रशासकीय आकार'' म्हणजे या उपविधीच्या तरतुदीचे कोणत्याही व्यक्तीने पालन न केल्यामुळे त्याच्या निवारणार्थ महानगरपालिकेला कराव्या लागणाऱ्या कामासाठी येणारा खर्च.

ऊ ''आयुक्त'' म्हणजे अधिनियमाच्या कलम ३६ च्या तरतुदीनूसार वेळोवेळी शासनाकडून नेमणूक केलेली व्यक्ती.

इ घनकचरा या संज्ञेत धूळ , राख, विटांचे तुकडे , चुना , काचेचेतुकडे, बागेतील किंवा तबेल्यातील केरकचरा व दुर्गंधीयुक्त पदार्थ किंवा मलजल नसलेला कोणात्याही पृकारचा केरकचरा, यांचा समावेश होतो. तसेच अधिनियमाच्या कलम २(२१) मधील घाणीचाही समावेश असेल.

उ घनकचरा व्यवस्थापन , घनकचरा व्यवस्थापनामध्ये

-- कचरा निर्मितीच्या जवळच्या ठिकाणी त्याची साठवणूक व वाहतूक

-- घनकचरा संकलन, वर्गीकरण व त्यावरील प्रक्रिया.

-- रस्ते सफ़ाई व

-- घनकचऱ्याची विल्हेवाट

-- नागरी घनकचरा व्यवस्थापन नियम,२००० मधील विहित केलेल्या सर्व कर्तव्यांचा .

-- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नमूद केलेल्या सर्व कर्तव्यांचा समावेश असेल.

ऊ) ''ओला कचरा'' अथवा ''जैविक विघटन'' होवू शकणारा कचरा म्हणजे स्मूक्ष्मजीवांद्वारे ज्या पदार्थांचे विघटन होवून सेंद्रीय खताची निर्मिती होवू शकते व यात फ़ळे, भाजीपाला, पालापाचोळा, मांस, मासे, यांचा खाण्यात वापर करण्यासाठी उपयोगी भाग अलग केल्यावर उरलेला निरूपयोग भाग किवा शिळे अन्न इत्यादींचा समावेश असेल. परंतू अशा प्रकारे विघटीत होवू शकणाऱ्या केवळ पाण्याच्या अस्तित्वामुळे ओल्या झालेल्या कचऱ्याचा यात समावेश असणार नाही.

ए) ''पालापाचोळा'' या शब्दात झाडाच्या छाटलेल्या फ़ांद्या, सुकलेली पाने, गवत, यांचा समावेश असेल.

ओ) ''धोकादायक (Hazardous) कचरा''किंवा उपशिष्ट याचा अर्थ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ (१९८६ चा २९) च्या कलम ६,८, व २५ च्या तरतुदीनूसार केंद्र शासनाने केलेल्या धोकादायक उपशिष्टे (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९८९ च्या नियम ३(आय) मध्ये विहित केल्याप्रमाणे असेल व यात खालील घरगुती (धोकादायक) कचऱ्याचा समावेश असेल.

टॉर्चमध्ये वापरून झालेल्या बॅटरी , स्वयंपाक घर वा स्वच्छतागृहात वापरली जाणारी रसायने, पावडरी वगैरे मोटार गाडयांच्या बॅटरी, ऑईल, फ़िल्टर, वाहने सुस्थितीत ठेवण्यासाठी वापरले जाणारे पदार्थ , रसायने व विद्रावक पदार्थ व त्यांच्या साठवणूकीसाठी वापरलेली पात्रे, रासायनिक पदार्थांचा वापर असलेली प्रसाधने, जंतुनाशके व त्यांची रिकामी पात्रे, विजेचे दिवे, टयुब लाईट वा तत्सम वस्तू, औषधे (मुदतबाहय औषधांसह) रंग, तेल, वंगणे, डिंक वा त्या

वस्तू ठेवलेली रिकामी पात्रे छायाचित्रे तयार करण्यासाठी वापरली जाणारी रसायने, फ़ोम पॅकेजींग, थरमामिटर किंवा पारा वापरलेली अन्य उपकरणे.

औ ) ''जैविक कचरा'' म्हणजे मनुष्यप्राण्याच्या / जनावरांच्या / पक्षांच्या रोगाची चिकित्सा, औषोधोपचार वा प्रतिबंधात्मक उपाययोजना करतांना वा यासंबंधातील संशोधन/उत्पादन/चाचणीसाठी केलेल्या कारवाईत निर्माण झालेले / वापरलेले टाकाऊ पदार्थ.

औ ) ''सुका कचरा'' म्हणजे जैविक विघटन होवू शकणारा कचरा, पालापाचेळा, धोकादायक वा जैविक कचऱ्या व्यतिरिक्त घरातील / धंद्याच्या जागेतील/दुकानाचे जागेतील कचरा, मात्र यात राज्य शासनाने वापरासाठी प्रतिबंध केलेल्या व पुर्ननिर्माणासाठी उपयोगी नसलेल्या प्लॉस्टिकचा समावेश असणार नाही.

अ: ) ''पुनरूत्पादनासाठी उपयुक्त कचरा'' म्हणजे ज्याचा वापर करून उपयोगी पदार्थ निर्माण करता येणे शक्य असते. यात कागद , काच, धातू, राज्य शासनाने वापरासाठी प्रतिबंध न केलेले प्लास्टीक वगैरे गोष्टींचा समावेश होतो.

२) या उपविधींत वापरण्यात आलेल्या ज्या शब्दांचा वा शब्दसमूहांचा अर्थ खंड (१) मध्ये समाविष्ट नसेल त्यांचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरण्यात आले असतील तो असल्याचे समजण्यात येईल.

३) उपविधींची अंमलबजावणी करण्याचे काम सोपवण्यात आलेले महानगरपीलका प्राधिकारी.

१) औरंगाबाद महानगरपालिकेतील या उपविधींच्या तरतुदी अंमलात आणण्याचे काम ज्या महानगरपालिकेच्या प्राधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आले आहे ते पूढील प्रमाणे आहे.

अ महापौर / उप महापौर

ब आयुक्त

क आरोग्य वैद्यकिय अधिकारी

२ वरिष्ठ अधिकारी उपविधींच्या कलम (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे नागरी घनकचरा व्यवस्थापनाच्या अंमलबजावणीकरीता जबाबदार असतील.

३ ही जबाबदारी पार पाडण्यासाठी संबंधित प्राधिकाऱ्यांनी घनकचरा व्यवस्थापनाची नियोजनबध्द पध्दत विहित करणे आवश्यक आहे.

४ धुळ कचरा इत्यादी गोळा करणे मालक व भोगवटादाराची जबाबदारी

१ आयुक्तांने सार्वजनिक रस्त्यांच्या साफ़सफ़ाईसाठी केलेल्या तरतुदी वगळता, महापालिका हद्यीतील प्रत्येक जागेचा मालक/ भोगवटादार त्याचे ताब्यातील/ वापरातील (जागा वापरात असली किंवा नसली तरीही) जागेतील केरकचरा गोळा करून या उपविधीच्या तरतुदीनुसार नेमून दिलेल्या पध्दतीने त्याची विल्हेवाट लावण्यास जबाबदारी असेल.

२ कोणत्याही सार्वजनिक जागेवर, धुळ , राख, घनकचरा, धोकादायक कचरा, जैविक कचरा धंद्यातील केरकचरा, ओला कचरा , मलमुत्र किंवा इतर कोणतेही दूषित पदार्थ विसर्जित केलेले किंवा ठेवलेले आढळून आल्यास, तद्‌विरूध्द सिध्द करण्यात येईपर्यंत, ते अशा जागेशेजारील जागेच्या भोगवटादाराने / मालकाने ठेवले असल्याचे समजण्यात येईल.

५ केर कचरा साठविण्याची व विल्हेवाटीची पध्दत विहित करण्याचा महानगरपालिकेचा अधिकार

१ महानगरपीलिका विहित करेल त्या पध्दतीनूसार कचऱ्याचे वर्गीकरण, साठवणूक करण्याची व विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कचरा निर्माण करणाऱ्यावर असेल.

२ अ निरनिराळ्या प्रकारच्या कचऱ्याच्या साठवणूकीची व त्यांच्या विल्हेवाटीचे पध्दत महानगरपालिका विहित करील. या पध्दतींना योग्य ती प्रसिध्दी दिली जाईल.

ब महानगरपालिकेने पोट उपविधी २(अ) प्रमाणे मान्यता दिल्यानंतर सुक्या कचऱ्याची पुर्नवापरासाठी उपयुक्तता लक्षात घेवून त्यांचे आणखी वर्गीकरण करून त्यानूसार त्यांच्या स्वतंत्र साठवणूकीचे व विल्हेवाटीच्या पध्दतीबाबत आदेश देण्यास आयुक्त सक्षम असेल.

३ केरकचऱ्याच्या साठवणूकीच्या वर्गीकरणाच्या व विल्हेवाटीच्या विहित पध्दतीत सूधारणा झाल्याने कोणतीही नवी पध्दत अंमलात आल्याचे आयुक्तांने जाहिर केल्याच्या तारखेपासून केरकचऱ्याची साठवणूक व विल्हेवाट सुधारित पध्दतीने करण्याची जबाबदारी कचरा निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर असेल.

६ प्लास्टीकचा कचऱ्यात समावेश करण्यावर निर्बंध:-

१ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ (१९८६ चा २९) च्या तरतुदीनूसार केलेल्या पर्यावरण (संरक्षण) नियम ४ च्या अधिकारात राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानूसार किमान विहित जाडी असेलेले नवीन प्लास्टीक व पुनचक्रित प्लास्टीकच्या पिशव्यांचे उत्पादन विक्री, आयात व पूरवठयावर बंदी घातलेल्या प्लास्टीकचा कोणत्याही प्रकारच्या कचऱ्यात समावेश करता येणार नाही.

२ वरील तरतुदींचा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग झाल्यास रूपये १००/- या प्रमाणे प्रशासकीय आकार वसूल करण्यात येईल.

७ केरकचऱ्यांच्या विल्हेवाटीची पध्दत :

१अ उपविधी ४ च्या तरतुदीनूसार विहित करण्यात आलेल्या पध्दतीप्रमाणे गोळा करण्यात आलेल्या कचऱ्यांचे वर्गीकरण करून साठवणूक करण्याचे व विल्हेवाट लावण्याचे, मालकावर वा भोगवटादारावर बंधन असेल.

ब ज्या व्यक्तींच्या ताब्यातील चतुष्पाद प्राणी जनावर वा पक्षी सार्वजनिक जागी वा रस्त्यावर मलमूत्र विसर्जन करील, त्या व्यक्तीवर ते मलमूत्र काढून घेवून ती जागा/रस्ता स्वच्छ करण्याची जबाबदारी असेल.

क उपविधी ४ प्रमाणे गोळा करण्यात आलेला कचरा, मलमूत्र किंवा कोणतेही दूषित पदार्थ कचराकूंडयात टाकतांना वा कचरा गाडीवर नेवून देताना व वाहतूक करतांना त्याचा कोणताही भाग रस्त्यावर, नालीत वा दुसऱ्या कोणत्याही जागेत पडता कामा नये. असा सांडलेला कचरा ताबडतोब पूर्णपणे काढून घेवून रस्ता स्वच्छ करण्याची जबाबदारी कचरा सांडणाऱ्या व्यक्तीवर असेल.

ड गोळा करण्यात आलेला कचरा मालक/भोगवटादार/कचरा वाहतूक करणारा कंत्राटदार वा इतर कोणीही व्यक्तीने जाळता कामा नये.

इ महानगरपालिकेने कचरा घरोघरी जावून गोळा करण्याचे विहित केल्यास, घरातील किंवा संस्थेतील कचरा नगरपालिकेचे कर्मचारी अथवा एजन्सीकडे विहित केलेल्या वेळी सुपूर्द करणे जागेच्या मालकावर / भोगवटादारावर बंधनकारक राहील. कचरा जमा करण्यासाठी आयुक्तांने ठिकाणे निश्चित करून निरनिराळया प्रकारच्या कचऱ्यासाठी वेगवगळया रंगाच्या कचराकूंडयाची व्यवस्था केल्यास जागामालक/भोगवटादारांना त्याही कचरा कुंडयात घरगुती धंद्यातील कचरा टाकण्याची मुभा असेल मात्र त्या कुड्यात कचरा ''ओला व सुका'' किंवा दगड माती टाकण्याची जबाबदारी संबंधीत मालकावर व भोगवटादारावर राहील.

फ वरील पोट उपविधी (अ) ते (इ) चा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग झाल्याच्या पहिल्या वेळी रू.१००/- व पुढील प्रत्येकवेळी रूपये २५०/- प्रशासकीय आकार वसूल केला जाईल.

२(अ) कचऱ्यातून, पुर्नवापरासाठी योग्य असणाऱ्या वस्तू , या बाबतीत आयुक्ताने प्राधिकृत केलेली संस्था/व्यक्ती संकलीत व वेगळया करून त्यांचा स्वत:साठी विनियोग करू शकेल.

मात्र, सुक्या कचऱ्यातून अशा वस्तू शोधण्यासाठी कचराकुंडीतील कचरा मोकळया जागेवर बाहेर काढता येणार नाही.

ब वरील (२ -अ) च्या तरतुदीच्या भंग करणाऱ्या व्यक्तीकडून असा भंग झाल्याच्या पहिल्या वेळी रूपये २५/- व पूढील प्रत्येक वेळी रूपये ५०/- प्रशासकीय आकार वसूल केला जाईल.

८ भूखंडाचे विकास काम करतांना कचराकुंडयासाठी राखीव जागा ठेवणे बंधनरकारक

अ) महानगरपालिकेच्या हद्यीतील ५०० चौ.मी. वा त्यापेक्षा अधिक क्षेत्राच्या भूखंडावर विकास काम करतांना योग्य आकाराच्या क्षेत्रफ़ळाची जागा कचरा साठवणूकीसाठी त्या भूखंडाचे क्षेत्रात राखीव ठेवण्याची विकासाची जबाबदारी असेल.

ब) जागेचे भोगवटादार या राखीव जागेत आयुक्ताने विहित केलेल्या संकल्पने नूसार तयार केलेल्या किंवा महानगरपीलकेने विहीत केलेल्या किंवा पूरविलेल्या कचराकूंडया ठेवण्यासाठी जबाबदारी असतील अशा कचराकूंडया वापरण्याची जबाबदारी भोगवटादारांवर असेल.

क) या जागेचा दूसऱ्या कोणत्याही कारणासाठी उपयोग झाल्यास अन्य कोणत्याही अधिनियमांच्या / नियमांच्या तरतुदींना बाधा न येता या उपविधींच्या तरतुदीसाठी तो सार्वजनिक उपद्रव समजला जाईल.

ड) या उपविधीतील वरील तरतुदींचा भंग करणाऱ्या मालक/भोगवटादार यांचेकडून पहिल्या वेळी रूपये ५०००/- व त्यानंतरही तो भंग तसाच चालू राहिल्यास पूढील प्रत्येक वेळी रूपये १०,०००/- एवढा प्रशासकीय आकार वसूल करण्यात येईल.

''रेखांकन मंजूर करीत असतांना रेखांकनामध्ये कचरा साठवणूकीसाठी योग्य ते क्षेत्र राखीव ठेवण्याची जबाबदारी मिळकतधारक, मालक किंवा विकासक यांची राहील''.

९ मोठया प्रमाणावर कचरा निर्माण होणाऱ्या संस्था/शाळा/महाविद्यालये/हॉटेल्स/गोठे/तबेले यांचेकडील कचऱ्याची विल्हेवाट:

कोणत्याही संस्था/हॉटेल्स/वर्कशॉप/गोठे/तबेले/वसतीगृहे/मंगल कार्यालये इत्यादी ठिकाणी मोठया प्रमाणावर कचरा निर्माण होतो. त्या जागेच्या भोगवटादारांना मालकांना अधिनियमांच्या कलम १३७ च्या तरतुदीनूसार विशेष दराने साफ़सफ़ाई कर व शूल्क निश्चित केले जाईल. किंवा आयुक्तांने निर्देश दिल्यास कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी आयुक्त यांच्या बरोबर संविदा करणे बंधनकारक असेल.

१० अ ) उद्योगधंद्यापासून निर्माण होणारा व धोकादायक नसलेला कचरा आयुक्तांने त्यासाठी ठरवून दिलेल्या जागी स्वखर्चाने वाहतूक करून विहित पध्दतीने जमा करण्याची जबाबदारी उद्योजगांवर राहील.

ब) वरील (१ अ) च्या तरतुदीचा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग झाल्या प्रत्यंक वेळी रूपये ५०००/- प्रशासकीय आकार वसूल केला जाईल.

२ उद्योगधंद्यातून निर्माण होणारी धोकादायक (Hazardous) अपशिष्टे (Wested) गोळा करणे, साठविणे व त्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ खाली करण्यात आलेल्या धोकादायक अपशिष्टे (व्यवस्थापन व हाताळणी ) नियम १९८९ च्या तरतुदीप्रमाणे उद्योगधंद्याच्या जागेचा मालक /भोगवटादारावर राहील.

३ उपरोक्त तरतुदीचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या तरतुदीप्रमाणे कायदेशिर कार्यवाही करण्या व्यतिरिक्त , महापालिका अधिनियमाच्या कलम ३१३,३७६ (अ) अन्वये रू.१०००/- इतका दंड वसूल केला जाईल.

११ खाजगी बाजार व कत्तलखान्यात निर्माण होणारा कचरा

१ अ) अधिनियमाच्या कलम ३७८ च्या तरतुदीनूसार खाजगी बाजार व खाजगी कत्तलखांना उघडण्यास महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीतील अटीनूसार अशा बाजारात /

कत्तलखान्यात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी परवानगीधारकांवर असेल.

ब) अशा बाजारात / कत्तलखान्यात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पूरेशी यंत्रणा निर्माण करण्याची जबाबदारी परवानगीधारकावर असेल व या यंत्रणे संबंधीचा तपशील मागणी करताच त्याने आयुक्तांना पूरविणे आवश्यक असेल, आवश्यकतेप्रमाणे आयुक्तांला या यंत्रणेत कोणातही फ़ेरफ़ार सुचविता येईल व त्याप्रमाणे यंत्रणा सिध्द ठेवण्याची जबाबदारी परवानाधारकांवर असेल.

क) वर ब प्रमाणे पूरविण्यात आलेल्या तपशिलानूसार यंत्रणा कार्यरत आहे किंवा नाही हे तपासण्याचा आयुक्तांना अधिकार असेल.

ड) कचरा उचल्याचे कामातील त्रुटी परवानगीधारकाच्या निदर्शनास आणून दिल्यावर आयुक्तांच्या सूचनेप्रमाणे यंत्रणेत आणखी वाढ करणे आवश्यक असल्यास ४८ तासात तशी सूधारणा करण्याचे परवानगीधारकावर बंधन राहील.

२ वरील तरतुदींचा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग झाल्याच्या प्रत्येक वेळी रू. ५,०००/- प्रशासकीय आकार वसूल करण्यात येईल.

१२ जैविक कचराची विल्हेवाट

१अ) जैविक कचरा तयार होणाऱ्या प्रत्येक संस्थेचा भोगवटादार/मालक/मनुष्यप्राण्याच्या आरोग्यावर तसेच पर्यावरणावर कोणताही परिणाम होवू न देता, अशा कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास पूर्णत: जबाबदार असेल.

ब) त्या कचऱ्याची विल्हेवाट लावताना पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ व जैविक कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम , १९९८ च्या तरतुदीचे पालन करणे जागेचा भोगवटादार/मालक यांचेवर कायदेशिर बंधन असेल.

क) वरील (१-अ ) मधील संस्था या शब्दात रूग्णालये, नर्सिंग होम्स, औषधालये, दवाखाने , दंतवैद्यकिय दवाखाने, पशुवैद्यकिय संस्था, तबेले, गोठे, पॅथॉलॉजिकल प्रयोगशाळा रक्तपेढया वा अशाच वा इतर कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या संस्थांचा समावेश आहे.

२) वरील तरतुदीचा भंग करणारया व्यक्तींकडून असा भंग झाल्याच्या प्रत्यंक वेळी रूपये १०,०००/- प्रशासकीय आकार वसूल करण्यात येईल.

१३ घाण पाण्याचे नि:सारण:

१ अ) कोणत्याही जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास अधिनियमाच्या कलम १५९ च्या तरतुदीनूसार आयुक्तांच्या लेखी परवानगीने त्याची खाजगी नाली पावसाने पाणी वाहून नेणाऱ्या किंवा घाण पाण्याच्या नि:सारणासाठी तरतुद केलेल्या योग्य त्या नालीत सोडता येईल.

ब) उपविनियम (१-अ) प्रमाणे परवानगी न घेता जोडलेल्या नालीसंबंधी अधिनियमाच्या कलम १८३ अन्वये कारवाई केली जाऊ शकेल.

२) वरील तरतुदींचा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग झाल्याच्या प्रत्येक दिवशी रूपये १०,०००/- प्रशासकीय आकार वसूल करण्यात येईल,.

१४ मोठया प्रमाणावर गर्दी करणाऱ्या ठिकाणी फ़िरत्या शौचालयांची सुविधा आवश्यक:

१ सार्वजनिक मेळावे, सभा, अधिनवेशने , यात्रा इत्यादी ज्या प्रसंगी मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. त्या ठिकारणी जमीन मालकाने/भांगवटादाराने / त्या समारंभाच्या / प्रसंगाच्या संयोजगाने, फ़िरत्या शौचालयाची व कचरा कूंडयाची सूविधा उपलब्ध करणे बंधनकारक असेल.

२ अशा मेळाव्यासाठी जमणाऱ्या गर्दीच्या प्रमाणाचा अनूभव लक्षात घेवून ही सूविधा खालील प्रमाणात उपलब्ध करून द्यावी लागेल.

| स्वच्छता गृहे (१००० व्यक्तींसाठी) | | कचराकुंडया (१०,००० व्यक्तींसाठी) |
|---|---|---|
| पुरूष | ३ | |
| स्त्रीया | ३ | २ व्यक्तीसाठी ०.२० घ.मी.+ १ घ.मीटर |
| अपंग | १ | |

३ आयुक्तांने पुरूष /स्त्रीया / अपंग यांचेसाठी निश्चित करून दिलेल्या प्रमाणात अशी सुविधा उपलब्ध केल्याचे आढळून आल्यास त्यानंतर जी सफ़ाई करावी लागेल त्याचा खर्च संबंधीतांकडून वसूल केला जाईल. तसेच तो सार्वजनिक उपद्रव समजला जाईल व उपविधी क्र.१४ च्या तरतुदीनूसार विहित प्रशासकीय आकार द्यावा लागेल.

१५ कलम २९२ अन्वये नेमून देण्यात न आलेल्या जागेवर केरकचरा/मलमूत्र विसर्जित करणे वगैरे.

अ) मलमूत्र विर्सजन, सार्वजनिक जागेवर थूंकणे वा कोणतेही दूषित पदार्थ, धूळ , राख, केरकचरा, कचरा, धंद्यातील केरकचरा सार्वजनिक जागेवर टाकणे असे कोणतेही कृत्य करताना कोणतीही व्यक्ती आढळल्यास महानगरपीलिका अधिनियमातील तरतुदी शिवाय अन्य अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कायदेशिर कार्यवाहीस पात्र राहील. अशी व्यक्ती अज्ञान असल्यास तरतुदीने उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीचा पालक अशा कायदेशिर कार्यवाहीस पात्र राहील.

ब ) याशिवाय या उपविधींच्या तरतुदीनूसार ती उपकृती समजण्यात आल्यामुळे उपविधी क्र.१४ च्या तरतुदीनूसार विहित प्रशासकीय आकार द्यावा लागेल.

१६ सार्वजनिक उपद्रव करणे व त्यासाठी देय असणारे प्रशासकीय शुल्क:

अ) सार्वजनिक आरोग्याच्या परिक्षणासाठी अधिनियम , त्याखालील नियम व या उपविधीतील तरतुदींचे तंतोतंत पालन करणे ही प्रत्यंक संबंधीत व्यक्तींची विधीवत जबाबदारी आहे असे असूनही जाणता वा अजाणता त्या तरतुदींचे पालन न झाल्यास त्याचा सार्वजनिक आरोग्यावर होणारा परिणाम विचारात घता ती बाब सार्वजनिक उपद्रव या सदरात मोडते. या तरतुदींच्या उल्लंघनासाठी संबंधीत व्यक्तींवर अधिनियमातील तरतुदीनूसार योग्य ती कायदेशिर कार्यवाही केली जाईल.

ब) त्या व्यतिरिक्त सार्वजनिक आरोग्यावर परिणाम होवू न देण्यासाठी या उपविधींच्या अंमलबजावणीची जबाबदारी महानगरपालिकेच्या प्रशासन यंत्रणेवर असलयाने निर्माण केलेला उपद्रव दूर करण्यासाठी या उवविधींच्या तरतुदीत विहित केलेल्या प्रशासकीय आकाराची वसूली अधिनियमाच्या कलम ४३९ च्या तरतुदीनूसार केली जाईल.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती यांचे मार्फत सादर करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**<u>विषय क्र. ३६४/३:</u>**

शिक्षणाधिकारी यांनी औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळांच्या गुणवत्ता वृध्दीसाठी काही उपाय योजना व काही कृती कार्यक्रमांचा प्रस्ताव सादर केला आहे.

(१) मुख्याध्यापक व शिक्षकांनी शाळेत व वर्गात वेळेवर उपस्थित रहावे,यास्तव अनुपस्थितीची आगाऊ लेखी स्वरूपातील सूचना शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी शिक्षण अधिकारी यांना द्यावी.

(२) वर्गातील विद्यार्थाची कौटुंबिक , आर्थिक परिस्थिती संदर्भातील कार्डस शाळेत उपलब्ध असावेत.

(३) विद्यार्थ्यांना विशेष रूची असलेले विषय, शिक्षणा विषयी त्यांना वाटणारी नकारात्मकता या बद्यल प्रत्येक विद्यार्थ्यांची माहिती वर्गशिक्षकांनी येत्या महिन्याभरात संकलित करावी.

(४) शक्यतो संबंधित प्रभागाच्या नगरसेवक/नगरसेविकांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक शाळेत

''पालक शिक्षक संघांची '' स्थापना करून दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी त्या संघाची बैठक व्हावी. या बैठकीत शाळेची गुणवत्ता , शैक्षणिक दर्जा इ. बाबत तसेच शाळेच्या अडचणीं बाबत चर्चा व्हावी. बैठकीचे इतिवृत्त मुख्याध्यापकांनी शिक्षणाधिकारी यांचेकडे बैठकीनंतर तीन दिवसात पाठवावे.

(५) शिक्षकांनी विद्यार्थ्यांची व त्यांच्या कुटुंबियांशी जवळीक साधणारे उपक्रम राबवावेत व विद्यार्थ्यांच्या घरी होणाऱ्या कार्यक्रमांना उपस्थित रहावे. पालकांना वारंवार शाळेत बेलावून त्यांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती देणे. वर्षातून दोनदा पालकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे, शाळेत दर सप्ताहास विविध स्पर्धांचे आयोजन करणे, विद्यार्थ्यांचे आरोग्य व नीटनेटकेपणा याकडे वैयक्तिक लक्ष पुरविणे, महानगरपालिकेच्या शालेय आरोग्य कार्यक्रमांमधून आपल्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेवून आजारपणाबाबत नोंदी ठेवणे व उपचारासाठी उपाययोजना करणे.

६) नियमित शाळेत येणाऱ्या व विविध स्पर्धांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करणे, शाळेतील अनुपस्थितीची कारणे शोधून त्यांच्या पालकांशी चर्चा करून त्यात सुधारणा घडवून आणणे.

७) मुख्याध्यापक, शिक्षक/ शिक्षीका, सांस्कृतिक अधिकारी, क्रीडा अधिकारी,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निलंबित करणेचा व दंडात्मक कार्यवाही करणेचा अधिकार शिक्षणाधिकारी यांचेकडे असावा.

८) खाजगी शाळांमधील गुणवंत शिक्षकांकडून महानगरपालिका शाळा तसेच विद्यार्थ्यांच्या वार्षिक उत्तरपत्रिकेचे मुल्यमापन करून घेणे.

९) सांस्कृतिक अधिकारी व क्रीडा अधिकारी यांनी प्राधान्याने महानगरपालिका शाळांमधून उपक्रम आयोजित करणे ही त्यांची मुळ व प्रमुख जबाबदारी असेल.

१०) शाळांमधून दर्जेदार स्नेहसंमेलन,क्रीडा स्पर्धांचे आयोजन, आधुनिक शैक्षणिक साहित्याचा वापर, प्रात्यक्षिके दाखविणे, वनस्पती,पर्यावरण संबंधी माहिती देणे, सहलींचे आयोजन, राष्ट्रीय भावना वृध्दींगत करणारे उपक्रम, शैक्षणिक पात्रतेनुसार निर्धारीत पातळीपेक्षा शैक्षणिक क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अधिक वर्गांचे आयोजन करणे, शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे, मुलभूत सुविधांचा योग्य वापर करणे मुख्याध्यापकांची जबाबदारी असेल.

११) विशेष मेहनत घेणाऱ्या शिक्षक/ मुख्याध्यापकांना अतिरिक्त वेतनवाढ व प्रमाणपत्र गौरवपूर्वक दिनांक ८ डिसेंबर महानगरपालिका वर्धापन दिनी प्रदान करणे व दिनांक ५ सप्टेंबर रोजी (शिक्षक दिन) आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात येते ती प्रथा कायम ठेवावी.

१२) स्वच्छ व सुंदर शाळा योजने अंतर्गत प्रत्येक विभागातील एका शाळेस वार्षिक पारितोषिक देण्यात यावे, त्यासाठी वरील उपक्रमांचे आयोजन व इ.४ थी,इ.७ वी बोर्डाच्या परिक्षेतील यश हे निकष असावेत.

१३) जागा उपलब्ध असल्यास शाळेभोवती वृक्षारोपण करणे व झाडे किमान तीन वर्ष जगविणे ही मुख्याध्यापकांची जबाबदारी राहील. या संदर्भातील त्यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद त्यांच्या गोपनिय अहवालात केली जावी.

(१४) दोन शाळा पर्यवेक्षक व उप शिक्षणाधिकाऱ्यांची दोन पदे मनपा मुख्याध्यापकांमधून भरण्यात यावीत.

(१५) ही पध्दत अंमलात येई पर्यंत मनपा अधिकाऱ्यांची शाळा तपासणी साठी टीम तयार करण्यात यावी.

(१६) चार स्कूल सोशल वर्कर्सची करारपध्दतीवर नियुक्ती करण्यात यावी.

(१७) शिक्षणाधिकाऱ्यांना प्रत्येक महिन्याला रूपये ५०००/- पर्यंत खर्च मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यांत यावे.

(१८) मुख्याध्यापक ,शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सर्व प्रकारच्या रजा मंजुरीचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना असावे.

(१९) शिक्षण विभागाचे भांडार पूर्वीप्रमाणेच शिक्षणाधिकारी यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र असावे.

(२०) सर्व शिक्षकांनी सकाळी / दुपारी शाळेच्या या वेळांचे पालन करून स्वत: प्रार्थना व राष्ट्रगीत करिता उपस्थित रहावे.

(२१) शाळेच्या वेळा मोठया अक्षरात शाळेच्या प्रवेशद्वारावर नमुद करावे.

(२२) शाळेच्या वेळेपूर्वी सेविका, चौकीदार यांनी वर्ग, परिसर, पूर्ण शाळा स्वच्छ करावी.

(२३) शाळेतील एका शिक्षकांला विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी व देण्यात येणारे खाद्य (खिचडी) तपासणीची जबाबदारी द्यावी तसेच मुख्याध्यापक यांनी संबंधित शिक्षकाला तांदुळाचा हिशोब ठेवण्याचे लेखी आदेश द्यावे.

(२४) प्रार्थनेकरिता जास्तीत जास्त विद्यार्थी उपस्थित रहातील याची सर्व शिक्षकवर्ग यांनी जबाबदारी घ्यावी. जर शाळेत विद्यार्थी येत नसल्यास त्यांच्या घरी जावून पालकांना तशी विनंती करण्यात यावी. प्रार्थने नंतर कमीतकमी २० मिनिट शिक्षक व विद्यार्थी यांनी जमलेल्या विद्यार्थ्यांना कवायत , सामान्यज्ञान ,दिनविशेष ,सुविचार ,दररोज घडणाऱ्या घटनांची माहिती देण्यात यावी.

(२५) शाळेत आल्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांनी हजेरी रजिस्टरवर स्वाक्षरी करावे.शिक्षण विभागात व प्रत्येक शाळेत मुख्याध्यापक /शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी मुव्हमेंट रजिस्टरवर नोंद करणे बंधनकारक राहील.

(२६) उशीरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेगळे रजिस्टरमध्ये नोंद घेत जावे.

(२७) वर्गात शिक्षकांनी सर्व विद्यार्थी हे मनपाने दिलेल्या स्वच्छ गणवेशात येतील याची काळजी घ्यावी.

(२८) मध्यान्तरामध्ये विद्यार्थी शाळेतून घरी जावू नये यासाठी उपाय योजना करण्याची जबाबदारी मुख्याध्यापक यांची राहील.

(२९) प्रत्येक शिक्षकाने वर्गात दररोज उपस्थिती नोंदणी करून गोषवाऱ्यात नोंद करणे.

(३०) समर्थनिय कारणाशिवाय मुख्याध्यापक यांनी कोणत्याही विद्यार्थ्यांस शाळा सोडल्याचा दाखला देणे बाबत शिक्षणाधिकारी यांचे कडे शिफ़िरस करू नये.

तरी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव माध्यमिक,पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती मार्फत सादर करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र.३६५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,आपल्या शहरात मा.शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे हे जुलै महिन्यात येत आहेत. महानगरपालिकेतर्फे अनेक मान्यवरांचे मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे मा.शिवसेनाप्रमुखांचा देखिल महानगरपालिकेतर्फे मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यांत यावा. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.किशनचंद लेखराज तनवाणी

अनुमोदक : १. श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले २. सौ.साधना गणेश सुरडकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांचे माहे जुलै मध्ये औरंगाबाद शहरात आगमन होत असल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे त्यांचे मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद